मजकुर :—

दिनांक—२९/०७/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ”** माहे मे —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे .

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मे —२०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | वनराई पोलीस ठाणे, परिमंडळ—१२ | गु.र.क्र.१८५/२०२४ कलम.३०२, २०१ भा.द.वि |

—: “ संशय व प्रेमप्रकरणातुन खुन ”:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयांत दिनांक २८/०५/२४ रोजी यातील फिर्यादी यांनी त्याच्याकडे भाडेकरु राहत असलेले जयराम लकाडा हे त्यांचा मोबाईल फोन उचलत नसल्याने व राहत असलेल्या ठिकाणी पोट माळयावरून दुर्गंधीचा वास अधिक उग्र झाल्याने, पोट माळयाकडे जाणाऱ्या शिडीस असलेला दरवाजाचा कुलूप तोडून शिडी वरून वर जावून पाहिले असता पोटमाळयाचे दरवाजा जवळ एक व्यक्ती कुशीवर संपुर्ण चादर पांघरलेल्या अवस्थेत काहीही हालचाल नसल्याचे स्थितीत जमिनीवर पडलेली दिसुन आले. सदरबाबत त्यांना संशय आल्याने फिर्यादी यांनी वनराई पोलीस ठाणे येथे सदर घटनेची माहिती दिल्यावरून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. समिर प्रविणचंद्र बाटविया. वय ५० वर्षे |
| मयत/बळीत व्यक्ती | :— | दिब्या जॉन टोप्पो वय २९ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | जयाराम सुकसाय लकडा, वय ३६ वर्षे<br>आ.अ .दि.२९/०५/२०२४, |

**तपास कौशल्य :—** यातील फिर्यादी नामे श्री. समिर प्रविणचंद्र बाटविया वय ५० व र्षे, रा. ठी —समिर प्रविणचंद्र बाटविया. वय ५० वर्षे यांचे वर नमुद घटणास्थळ न्यु अशोक नगर झोपडपट्टी, कामा इस्टेट, सर्व्हीस रोड, मेट्रो पिलर नंबर ४६५ चे समोर, गोरेगांव (पुर्व),वनराई या ठिकाणी त्याच्या कुटूंबासह रहावयास आहेत.

फिर्यादी राहत असलेला प्लॅट त्यांची बहीण नामे कु.लिना हिचे नावावर आहे. सदरचा प्लॅट न्यु अशोक नगर झोपडपट्टी, कामा इस्टेट, सर्व्हीस रोड, मेट्रो पिलर नंबर ४६५ चे समोर, गोरेगांव (पुर्व), मुंबई या ठिकाणी असुन सदर ठिकाणी सुप्रिम रबर इंडस्ट्री नांवाची कंपनी असुन सदर कंपनीचा ते प्रोपरायटर आहे. सदरच्या त्यांच्या कंपनीचे वर पहील्या माळयावर असणारी जागा त्यांनी भाडे तत्वावर दिली आहे. दिनांक २१/११/२०२२ पासुन दिनांक २०/१०/२०२३ पर्यंत सदरचा पोटमाळा श्री बाटविया त्यांची बहीण कु. लिना हिचेसह करारनामा करून, ओडीसा येथे रहाणारा जयराम लकाडा वय ३९ वर्षे यास दिली होता. सदरच्या ठिकाणी तो त्याची पत्नी श्रीमती दिब्या टोप्पो वय २९ वर्षे हिचेसह रहात होता. सदरचा करारनामा त्यांना वाढवुन पाहीजे होता. परंतु कामाच्या ओघात करारनामा करावयाचे राहुन गेले होते. दोघे पती—पत्नी हे खाजगीत काम करीत असल्याने ते दोघेही सकाळी कामावर निघुन जात असल्याने श्री बाटविया त्यांच्या बरोबर बोलणे होत नसे.

सदर कंपनी मधील कामगार सकाळी ०८.०० वाजता व मी ०९.३० वाजता कंपनीत येतो संध्याकाळी ०७.०० वा. कंपनी बंद करून रहाते ठिकाणी जात असतो सुमारे दोन ते तीन दिवसांपासुन त्यांच्या कंपनीच्या पोटमाळयावरुन दुर्गंधी येत होती. परंतु एखादा उंदिर मेला असावा असा त्यांचा व त्यांच्या कामगारांचा संशय होता. परंतु दिनांक २८.०५.२०२४ रोजी सकाळी १०:०० च्या सुमारास सदरची दुर्गंधी वाढत गेल्याने, ते व कपंनीचे कामगार नामे हेमंत आर्य यास सांगुन पोटमाळयावर विचारणा करण्यास सांगितले असता, सदरच्या पोटमाळयावर जाणाऱ्या दरवाजाला कुलुप असल्याचे दिसुन आले. त्यामुळे त्यांचे भाडेकरु नामे जयराम लकाडा याच्या मोबाईल नंबर ९३२४९५८१३९ संपर्क साधण्याच्या प्रयत्न केला असता, त्याने फोन स्विकारला नाही. काही वेळाने पुन्हा मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्याचा मोबाईल फोन स्वीच ऑफ होता. भाडेकरु जयराम लकाडा हा मोबाईल उचलत नसल्याने व पोटमाळयावरून दुर्गंधीचा वास अधिक उग्र झाल्याने, साधारणत: १०.३० च्या

सुमारास पोट माळयाकडे जाणाऱ्या शिडीस असलेला दरवाजाचा कुलूप तोडून निमुळत्या शिडी वरून वर जावून पाहिले असता पोटमाळयाचे दरवाजा जवळ एक व्यक्ती कुशीवर संपुर्ण चादर पांघरलेल्या अवस्थेत काहीही हालचाल नसल्याचे स्थितीत जमिनीवर पडलेली दिसुन आले. सदरबाबत त्यांना संशय आल्याने तसेच वास उग्र येत असल्याने फिर्यादी यांनी लगेच ११.१५ वा. सुमारास वनराई पोलीस ठाणे येथे आलो व घटनेची माहिती पोलीसांना दिली. त्याप्रमाणे वनराई पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार माझे सोबत लागलीच माझे कंपनीच्या ठिकाणी घटनास्थळी पोहोचलो.

पोलीसांनी जमिनीवर झोपलेल्या व्यक्तींच्या अंगावरील पांघरून काढून त्याखाली हिरव्या रंगाच्या प्लॅस्टीकच्या मोठी पिशवी खोलली असता त्यात मृत व अर्धवट कुजलेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह मिळुन आला. सदरच्या महीलेल्या मृतदेहाचे बारकाईने निरीक्षण केले असता, सदर मृत महिलेच्या गळया भोवती नायलॉनच्या दोरीने फास दिलेला दिसत होता व पाय देखिल दोरीने बांधलेले होते. मी सदर मृत महिलेस निरखून पाहिले व ओळखले की ती जयराम सुकसाय लकाडा याची पत्नी श्रीमती दिब्य टोप्पो होती. जयराम लकाडा यास मी पुन्हा त्याचे मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्याचा मोबाईल फोन स्वीच ऑफ असल्याने संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे श्री बाटविया यांची खात्री झाली की, जयरम लकाडा याने त्याची पत्नी श्रीमती दिब्य टोप्पो हिचा खून केला त्यामुळे त्यांचेविरूध्द वनराई पोलिस ठाणे येथे गुन्हा रजि.न. १८५/ कलम.३०२, २०१ भादवी अन्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा घडल्यानंतर गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे जयराम लकाडा याचे बॅक डिटेल व तांत्रिक मदतीने शोध घेतला असता तो दिनांक २४/०५/२०२३ रोजी मुंबई सेट्रल येथुन रेल्वेने न्यु दिल्ली या ठिकाणी गेला असल्याची सीडीआर डिटेल मध्ये माहिती प्राप्त झाली. त्यावरून तात्काळ वनराई पोलीस ठाण्याचे पोउनि इंद्रजित भिसे व पथकास रवाना करण्यात आले. त्या ठिकाणी गेल्यानंतर पाहिजे आरोपीताचे मोबाईल बंद असल्याने समजले त्यावेळी पाहिजे आरोपीताचे मोस्ट कॉलर यांना ताब्यात घेवुन त्याच्येकडे कौशल्यपुर्वक तपास करून पाहिजे आरोपी हा टिगरा गाव, सेक्टर—५६, गुरूग्राम राज्य— हरियाणा येथे असल्याचे माहिती प्राप्त झाली. पाहिजे आरोपीतास तेथील स्थानिक पोलीस ठाणे सेक्टर—५६ यांच्या मदतीने आरोपीतास दिनांक २९/०५/२०२४ रोजी शिताफिने ताब्यात घेवून त्यास स्थानिक पोलीस ठाणे सेक्टर—५६ या ठिकाणी चौकशीकरिता घेवून आले. नमुद आरोपीताकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबूली दिल्याने त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयातील आरोपीतास ३६ तासाच्या आत टिगरा गाव, सेक्टर—५६, गुरूग्राम राज्य— हरियाणा येथुन ताब्यात घेवुन सदरचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला

**वनराई पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, | आर. जी. राजभर | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक, | अतुल मोहिते | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक, | सचिन परदेशी | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक, | इंद्रजित भिसे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक, | बापुराव हराळ | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र ३३५६९ | प्रकाश मिसाळ | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र ०६७५४ | शंकर देशमुख | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोहक्र १८०८० | सागर पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र ०९२६१२ | आंनद पाटील | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोशिक्र ११०८३५ | इब्राहिम शेख | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक २९/०७/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे मे —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) १) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मे — २०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | क्क्ष—०२, गु.प्र.शा., गु.अ.वि., अंधेरी, मुंबई | गु.प्र.शा, गु.र.क्र., २८/२०१८, (डॉ. दा.भ. मार्ग पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्र. ७८/२०१८) कलम ३०२,२०१, ३६४,३६३, ३४ भा.द.वि |

—: '' बदल्याचे भावनाने खुन '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात कुमारी किर्ती राजेंद्र व्यास हया अंधेरी (प), मुंबई येथील 'बी ब्लंट' सलुन च्या कार्यालयात फायनान्स मॅनेजर म्हणून काम करीत असताना दि. १६/०३/२०१८ रोजी किर्ती या सकाळी कामावर जाण्याकरीता घरातून निघाल्या, परंतु त्या नेहमी प्रमाणे रात्री घरी न आल्याने त्यांचे वडील श्री. राजेंद्र हर्शदलाल व्यास यांनी डॉ. दा.भ. मार्ग पोलीस ठाणे येथे किर्ती व्यास हरविलेबाबत तक्रार दिली म्हणुन गुन्हा नोंद.

सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान असे निष्पन्न झाले की, सिध्देश ताम्हणकर याने त्याच्या कामात सुधारणा घडवून आणावी अन्यथा त्याचे विरुध्द आणखी गंभीर कारवाई करण्यात येईल, अशी किर्ती व्यास यांनी सिध्देश ताम्हणकर यांस नोटीस दिली होती. सदर नोटीसची मुदत संपत असल्याने व सिध्देश, खुशी यांचे प्रेमप्रकरण हे किर्ती व्यास यांना माहिती असून ते उघड होऊ नये म्हणुन, याचा राग मनात ठेवून खुशी आणि सिध्देश यांनी संगनमताने किर्ती व्यास यांना त्यांच्या घराजवळून अपहरण करुन त्यांना ऑफिसला न सोडता त्यांनी नवजीवन सोसायटी ते सातरस्ता दरम्यान किर्ती व्यास हिचा कार मध्ये गळा आवळून जिवे ठार मारुन, पुरावा नष्ट करण्यासाठी वडाळा खाडीत मृतदेहाची विल्हेवाट लावली होती

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. संजीव सोपानराव गुंडेवाड, वय ४७ वर्षे |
| बळीत | :— | कुमारी किर्ती राजेंद्र व्यास |
| निकाल दिनांक | :— | दि. २८/०५/२०२४ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) सिध्देश शांताराम ताम्हणकर, वय २४ वर्षे,<br>२) श्रीमती खुशी अजय सजवानी, वय ४२ वर्षे,<br>आरोपी अटक दिनांक ०४/०५/२०२१ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा. न्यायालयाने मा.सत्र न्यायालय यांनी आरोपीस आजीवन कारावास, क ३६४ मध्ये १० वर्षे, कलम २०१ मध्ये ०७ वर्षे, कलम ३४१ मध्ये महिन्याची शिक्षा सुनावण्यात आली आहे. . |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात नमुद गुन्हयात आरोपी क्र. ०१ व क्र. ०२ यांचे मोबाईल वरुन झालेले संभा ाण, मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण व सी.सी.टी.व्हि. फुटेज, आरोपी क्र. ०२ हिचे मालकीची फोर्ड कंपनीची इको स्पोर्ट मोटार कार मध्ये मयत महिलेचे रक्त मिळून आले त्याबाबतचा न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचा अहवाल व आरोपी क्र. ०१ व क्र. ०२ हे एकत्रित गेस्ट हाऊस मध्ये वास्तव्यास असले बाबतची नोंदवही असे पुरावा आधारे आरोपीतास अटक करून दोषरोप त्र मा. न्यालयात सादर करण्यात आले

**क्क्ष—०२, गु.प्र.शा.,गु.अ.वि., मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | सचिन सदाशिव माने | प्रशस्तीपत्रक |
| | पेलीस उप निरीक्षक | जयेश कुलकर्णी | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | स.पो.उप.नि. | .एकनाथ कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.शि.क्र.०९.०४३६ | गणेश संतोष सपकाळ | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.शि.क्र. ११३५६६ | अमर लावंड | प्रशस्तीपत्रक |

# (ब) २) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मे — २०२४

| | | |
|---|---|---|
| ०२ | क्ष—०८, गु.प्र.शा., गु.अ.वि., अंधेरी, मुंबई | गु.प्र.शा., गु.अ.वि., गु.र.क्र. ७०/२०१२ कलम ३०२, ३९७, २०१,३६३, ३६४ (अ) ३४ भादविसं (ओशिवरा पोलीस ठाणे गु.र.क्र. २१८/२०१२) |

—: '' खुन '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात फिर्यादीने दिनांक ०४/०७/१२ रोजी ओशिवरा पोलीस ठाणे येथे हजर राहुन त्यांची पत्नी शेलिना, चार मुले, व फिर्यादी यांच्या मेहुनीची मुलगी नामे रेश्मा यांचेकडील रोख रक्कम, मोटारगाडया, व दागीन्यांच्या स्वरूपात असलेली मालमत्ता लबाडीने घेण्याच्या इराद्याने त्यांना कश्मिरला घेवुन जाण्याच्या बहाण्याने कश्मिरी इसम नामे परवेझ टाक, आसिफ शेख व त्यांच्या साथीदारांनी अपहरण केले बाबत तक्रार नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. नादीरशा हुसेनभाई पटेल, वय ५९ वर्षे, |
| बळीत | :— | मयत १) शेलीना पटेल, २) अझमीना पटेल, ३) रेश्मा पटेल उर्फ लैला र ४) झारा पटेल, ५) इम्रान पटेल, ६) रेश्मा सागीर खान उर्फ टल्ली |
| निकाल दिनांक | :— | दि. २८/०५/२०२४ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | परवेझ इक्बाल टाक, वय ३० वर्षे, आरोपी अटक दिनांक २८/०५/२०१२ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा. न्यायालयाने खुनासाठी आरोपीला मरेपर्यंत फाशी व पूरावा नष्ट करण्याक ०७ वर्षांचा सश्रम कारावास व १० हजार रूपये दंड आणि दंड भरण्यास अस ठरल्यास आणखी ०१ वर्षाचा सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने अटक आरोपी परवेझ टाक आणि पाहिजे आरोपी शाकीर वाणी हे दोघेही जम्मू काश्मीर येथे त्यांच्या राहत्या गावी निघून गेले होते. गुन्हा घडल्यापासून १७ महिन्यानंतर यातील आरोपींबाबत उपयुक्त माहिती प्राप्त नसताना सदर आरोपींपर्यंत पोहचून व एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसताना कौशल्यपूर्ण तपासाने परिस्थितीजन्य पूरावा, न्यायवैज्ञानिक पूरावा व प्राप्त पूराव्यांची साखळी यांच्याआधारे मा. न्यायालयात भक्कम केस उभी करण्यात तपास पथकाला यश आले.

मृतदेह हे सांगाडयांच्या स्वरूपात मिळून आले होते. मयतांची ओळख निश्चित करण्यासाठी डी.एन.ए. टेस्ट संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता पूरावा गोळा करण्यात तपास पथकाला यश लाभले. गुन्हयाचा हेतू आणि परिस्थितीजन्य पूरावा यांची साक्षीदारांच्या मार्फतीने सांगड घालण्यात आली.

तसेच यातील मयत नामे १) शेलीना पटेल, २) अझमीना पटेल, ३) रेश्मा पटेल उर्फ लैला खान, ४) झारा पटेल, ५) इम्रान पटेल, ६) रेश्मा सागीर खान उर्फ टल्ली यांच्या खुनाचा व पूरावा नष्ट करण्याचा गुन्हा अटक आरोपी नामे परवेझ टाक याचेविरूध्द संशयापलीकडे सिध्द झाल्याने मा. न्यायालयाने खुनासाठी आरोपीला मरेपर्यंत फाशी व पूरावा नष्ट करण्याकरीता ०७ वर्षांचा सश्रम कारावास व १० हजार रूपये दंड आणि दंड भरण्यास असमर्थ ठरल्यास आणखी ०१ व ाचा सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

**क्ष—०८, गु.प्र.शा.,गु.अ.वि., मुंबई, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहा. पोलीस आयुक्त, | श्रीमती जोत्स्ना रासम, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | सहा. पोलीस आयुक्त, | श्री. राजू कसबे, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | प्रभारी पोलीस निरीक्षक, | श्री. लक्ष्मीकांत साळुंखे, | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री. राहुल प्रभु, | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस निरीक्षक, सांगली, | श्री. संजय मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक, | जयेंद्र कानडे, | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र. ०१३१० | सचिन बोंगाणे, | प्रशस्तीपत्रक |